# CRISIL LIMITED

CRISIL
An S&P Global Company

**Regd. Office:** CRISIL House, Central Avenue, Hiranandani Business Park, Powai, Mumbai - 400 076
**CIN:** L67120MH1987PLC042363
**Tel.:** 022-33423000; **Fax:** 022-33423001; **Website:** www.crisil.com; **e-mail:** investors@crisil.com

## Notice of Postal Ballot to the Shareholders

Members are hereby informed that pursuant to Section 110 and other applicable provisions of the Companies Act 2013, read with Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, CRISIL Limited (the "Company") seeks their approval by way of postal ballot and e-voting in respect of resolutions as set out in the Postal Ballot notice dated July 23, 2019. The Company has on August 5, 2019 completed the dispatch of the Postal Ballot Notice, along with the Postal Ballot Form to the Members whose names appear on the Register of Members/List of Beneficial Owners as received from the National Securities Depository Limited (NSDL) and Central Depository Services (India) Limited (CDSL). Members whose names appear on the Register of Members/List of Beneficial Owners as on Friday, August 2, 2019 i.e. the cut-off date, will be considered eligible for the purpose of voting. A person who is not a Member as on Friday, August 2, 2019 i.e. the cut-off date for reckoning voting rights, should treat this Notice for information purposes only.

Shareholders who have received Postal Ballot Notice by e-mail and who wish to vote through Physical Postal Ballot Form can download Postal Ballot Form from the link https://evoting.karvy.com or the website of the Company, www.crisil.com. To seek duplicate Postal Ballot Form, please contact our Registrar and Transfer Agent, Mr. M.S. Madhusudan, General Manager, M/s. Karvy Fintech Private Limited, Unit: CRISIL Limited, Karvy Selenium Tower B, Plot No. 31 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Hyderabad 500 032. The Postal Ballot Notices are sent for seeking approval of the shareholders of the Company by postal ballot, including voting by electronic means, for the matters mentioned below:

| Item No. | Description of the Resolution |
|---|---|
| 1. | Special Resolution - Re-appointment of Mr. M Damodaran as an Independent Director |
| 2. | Special Resolution - Re-appointment of Ms. Vinita Bali as an Independent Director |

In compliance with provisions of Section 110 of the Act read with the Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company is offering e-voting facility to all the Shareholders of the Company. Karvy Fintech Private Limited, our Registrar and Transfer Agent, will be facilitating e-voting to enable the Shareholders to cast their votes electronically instead of dispatching Postal Ballot Form wherever an e-mail ID is registered. The voting period commences on Friday, August 9, 2019 at 9.00 a.m. and ends on Saturday, September 7, 2019 at 5:00 p.m. (Inclusive of both the days). The e-voting module shall also be disabled by Karvy Fintech Private Limited for voting thereafter.

The Board of Directors has appointed Mr. Makarand Joshi, Practising Company Secretary, as the Scrutiniser for conducting the Postal Ballot process in a fair and transparent manner. Shareholders are requested to note that duly completed and signed Postal Ballot Forms should reach the Scrutinizer on or before 5:00 p.m. on September 7, 2019. Postal Ballot Forms received after 5.00 p.m. on September 7, 2019 will be treated as invalid.

Shareholders can opt for only one mode of voting, i.e., either by Physical Ballot or e-voting. Shareholders opting for e-voting, are requested not to vote by Physical Ballot also and vice versa. In case a shareholder has cast their vote by Physical Ballot and e-voting, then voting done through valid e-voting shall prevail and voting done by Physical Ballot will be treated as invalid.

The result of the Postal Ballot shall be declared on September 9, 2019 at the Registered Office of the Company. The result of the Postal Ballot would be intimated to the Stock Exchanges where the Company's shares are listed, published in the newspapers and displayed along with the Scrutiniser's report on the Company's website viz. www.crisil.com.

For any grievances/queries relating to voting by Postal Ballot/electronic means, shareholders may contact Mr. M.S. Madhusudan, General Manager, M/s. Karvy Fintech Private Limited, Unit: CRISIL Limited, Karvy Selenium Tower B, Plot No. 31-32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Hyderabad 500 032.

For CRISIL Limited
Minal Bhosale
Company Secretary
ACS 12999

Mumbai, August 7, 2019

# क्रिसिल लिमिटेड

CRISIL
An S&P Global Company

रजि. ऑफिस: क्रिसिल हाऊस, सेंट्रल अव्हेन्यू,
हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई-४०० ०७६
सीआयएन: एल६७१२०एमएच१९८७पीएलसी०४२३६३;
दूरध्वनी: ०२२-३३४२३०००; फॅक्स: ०२२-३३४२३००१; वेबसाइट: www.crisil.com; ई-मेल: investors@crisil.com

## भागधारकांसाठी (शेअरधारकांसाठी) टपाल मतदानासाठी सूचना

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ११० आणि इतर लागू तरतुदी तसेच कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण आबंधने व प्रकटीकरण आवश्यकता) नियमने, २०१५ चे कलम ४४ यांच्या अनुरोधाने सभासदांना याद्वारे कळवण्यात येत आहे की, क्रिसिल लिमिटेड ही २३ जुलै २०१९ रोजी टपाल मतदान नोटिशीमध्ये नमूद करण्यात आलेल्या ठरावांच्या संबंधात टपाल मतदानाद्वारे आणि ई-मतदानाद्वारे सभासदांची मंजुरी प्राप्त करण्यास इच्छुक आहे. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनडीएसएल) आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांच्याकडून प्राप्त झाल्याप्रमाणे सभासदांच्या रजिस्टरमध्ये/लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये ज्यांची नावे आहेत त्या सभासदांना टपाल मतदान प्रपत्रासह, टपाल मतदानाची नोटीस पाठवण्याची प्रक्रिया कंपनीकडून ५ ऑगस्ट २०१९ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. शुक्रवार, २ ऑगस्ट २०१९ रोजी म्हणजेच कट-ऑफ तारखेला सभासदांच्या रजिस्टरमध्ये/लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये ज्यांची नावे आहेत, त्या सभासदांना मतदानाच्या हेतूसाठी पात्र मानण्यात येईल. मतदानाचा हक्क विचारात घेण्याबाबत शुक्रवार, २ ऑगस्ट २०१९ रोजी म्हणजेच कट-ऑफ तारखेला सभासद नसणाऱ्या व्यक्तीने ही नोटीस केवळ माहितीच्या हेतूसाठी विचारात घ्यावी.

ईमेलद्वारे टपाल मतदानाची नोटीस प्राप्त केलेले भागधारक आणि वास्तविक टपाल मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यास इच्छुक असणारे भागधारक हे https://evoting.karvy.com या लिंकवरून किंवा कंपनीच्या www.crisil.com या वेबसाइटवरून टपाल मतपत्रिका डाउनलोड करू शकतील. टपाल मतपत्रिकेची ड्युप्लिकेट प्रत प्राप्त करण्यासाठी, कृपया आमचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजन्ट, श्री. एम.एस. मधूसुदन, महाव्यवस्थापक, मेसर्स कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड, युनिटः क्रिसिल लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र.३१ आणि ३२, गचिबावली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रामगुडा, हैदराबाद- ५०००३२ यांच्याशी संपर्क साधा. निम्नलिखित हेतूंसाठी, टपाल मतदानाद्वारे, यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे करण्यात येणारे मतदान समाविष्ट, कंपनीच्या भागधारकांची मंजुरी मिळवण्यासाठी टपाल मतदानाची नोटीस पाठवण्यात येत आहेः

| बाब क्र. | ठरावाचे वर्णन |
|---|---|
| १. | विशेष ठराव - स्वतंत्र संचालक म्हणून श्री.एम.दामोदरन यांची पुनर्नियुक्ती |
| २. | विशेष ठराव - स्वतंत्र संचालक म्हणून श्रीमती विनिता बाली यांची पुनर्नियुक्ती |

अधिनियमाचे कलम ११० तसेच कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण आबंधने व प्रकटीकरण आवश्यकता) नियमने, २०१५ चे कलम ४४ यांच्या तरतुदींच्या अनुपालनाने, कंपनी ही कंपनीच्या सर्व भागधारकांना ई-मतदानाची सुविधा देऊ करत आहे. कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड, आमचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजन्ट, हे जेथे ईमेल आयडी नोंदणीकृत आहेत तेथे टपाल मतपत्रिका पाठवण्याऐवजी भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आपले मतदान करता येण्यासाठी ई-मतदानाची सुविधा सुसाध्य करत आहेत. मतदानाचा कालावधी शुक्रवार, ९ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होईल आणि शनिवार, ७ सप्टेंबर २०१९ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता (दोन्ही दिवस समाविष्ट) समाप्त होईल. त्यानंतर कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेडद्वारे ई-मतदान मॉड्युल हे मतदानासाठी अकार्यान्वित करण्यात येईल.

टपाल मतदान प्रक्रिया न्याय्य व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी संचालकीय मंडळाने श्री. मकरंद जोशी यांची, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, नेमणूक केलेली आहे. भागधारकांनी याची नोंद घ्यावी की यथोचितरीत्या पूर्ण केलेल्या आणि स्वाक्षरीकृत केलेल्या टपाल मतपत्रिका या ७ सप्टेंबर २०१९ रोजी संध्याकाळी ५.०० ला किंवा त्यापूर्वी परिनिरीक्षकांकडे पोहोचायला हव्यात. ७ सप्टेंबर २०१९ रोजी संध्याकाळी ५.०० नंतर प्राप्त झालेल्या टपाल मतपत्रिका या अग्राह्य मानण्यात येतील.

भागधारक हे केवळ एकाच प्रकारच्या मतदानाचा म्हणजेच एकतर वास्तविक मतदानाचा किंवा ई-मतदानाचा पर्याय स्वीकारू शकतील. ई-मतदानाचा पर्याय स्वीकारलेल्या लोकांना वास्तविक मतदान न करण्याची विनंती करण्यात येत आहे आणि तशीच उलटपक्षीही विनंती करण्यात येते. भागधारकाने वास्तविक मतदानाद्वारे किंवा ई-मतदानाद्वारे आपले मत देण्याच्या बाबतीत, ई-मतदानाद्वारे केलेले मतदान प्रभावी राहील आणि वास्तविक मतदानाद्वारे करण्यात आलेले मतदान अग्राह्य मानण्यात येईल.

टपाल मतदानाचे निकाल हे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये ९ सप्टेंबर २०१९ रोजी घोषित करण्यात येतील. टपाल मतदानाचे निकाल हे जेथे कंपनी सूचीबद्ध आहे त्या स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये कळवण्यात येतील, वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात येतील आणि परिनिरीक्षकांच्या अहवालासह कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच www.crisil.com येथे प्रसिद्ध करण्यात येतील.

टपाल मतदानाद्वारे/इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदानाशी संबंधित कोणत्याही समस्यांसाठी/शंकांसाठी, भागधारक हे श्री. एम.एस. मधूसुदन, महाव्यवस्थापक, मेसर्स कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड, युनिटः क्रिसिल लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र.३१ आणि ३२, गचिबावली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रामगुडा, हैदराबाद-५०००३२ यांच्याशी संपर्क साधू शकतील.

क्रिसिल लिमिटेडसाठी
मिनल भोसले
कंपनी सचिव
एसीएस १२९९९

मुंबई, ७ ऑगस्ट २०१९